महाविद्यालय आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र (MITSC) यांच्यात करण्यात आलेल्या सामंजस्य करारांतर्गत (MoU) 'करिअर कट्टा' उपक्रम राबविण्यासाठी एक सुदृढ व समन्वयात्मक यंत्रणा निर्माण केली जाते. या कराराचा उद्देश विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी करिअर मार्गदर्शन, कौशल्य विकास, उद्योजकता, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, तंत्रज्ञान आधारित प्रशिक्षण व रोजगाराभिमुख उपक्रम प्रभावीपणे राबविणे हा आहे. तसेच दोन्ही संस्थांच्या सहकार्याने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उपक्रमांची अंमलबजावणी करून विद्यार्थ्यांना व्यापक संधी उपलब्ध करून दिल्या जातात. याचा महाविद्यालयांना नॅकमध्ये उपयोग होतो.

### Center of Excellence (सेंटर ऑफ एक्सलन्स)

करिअर कट्टा अंतर्गत Center of Excellence स्थापनेद्वारे महाविद्यालयांमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व उद्योजकता विकासाला चालना दिली जाते. येथे डिजिटल क्लासरूम, कॉमन फॅकल्टी, ऑनलाइन मार्गदर्शन, मेंटरिंग व Mock Tests उपलब्ध असतात. Startup व Incubation सुविधा दिल्या जातात तसेच विद्यार्थी संख्येनुसार महाविद्यालयांना आर्थिक सहाय्य व पायाभूत सुविधा पुरवण्यात येतात.

### College of Excellence with Potential (कॉलेज ऑफ एक्सलन्स विथ पोटँशियल)

ही योजना १००० पेक्षा कमी विद्यार्थीसंख्या असलेल्या महाविद्यालयांसाठी राबवली जाते. या योजनेत वैयक्तिक किंवा क्लस्टर पद्धतीने सहभाग घेता येतो. करिअर, उद्योजकता, स्पर्धा परीक्षा व कौशल्य विकासावर भर दिला जातो. विद्यार्थी संख्येनुसार रु. ९,००० ते रु. ६०,००० पर्यंत प्रोत्साहनपर रक्कम दिली जाते. स्किल ट्रेनिंग व पायाभूत सुविधा हे प्रमुख घटक आहेत. यामधील सहभागासाठी सामंजस्य करार व करिअर संसद स्थापना अनिवार्य आहे.

### NAAC (नॅक)

करिअर कट्टा उपक्रमाचा NAAC (National Assessment and Accredition council) प्रक्रियेसाठी महत्त्वपूर्ण उपयोग होतो. हा उपक्रम विद्यार्थ्यांना करिअर विषयक मार्गदर्शन, रोजगार संधीची माहिती तसेच कौशल्य विकासाची संधी उपलब्ध करून देतो त्यामुळे महाविद्यालयाच्या Curricular Aspects आणि Student Support & Progression यासाठी फायदा होतो. करिअर कट्टाद्वारे आयोजित कार्यशाळा, चर्चासत्र आणि माहिती पुस्तिका तसेच मासिक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देतात ज्यामुळे महाविद्यालयाची गुणवत्ता वृद्धिंगत होते. करिअर कट्टा उपक्रम महाविद्यालयाच्या शैक्षणिक उपक्रमांना दिशा देतो आणि NAAC मूल्यांकनात महत्त्वपूर्ण योगदान देतो.